adani Electricity

**अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड**
नोंदणीकृत कार्यालय: अदाणी हाऊस, ५६, श्रीमाली सोसायटी,
मिठाकाली सिक्स रोड जवळ, नवरंगपुरा, अहमदाबाद, गुजरात ३८० ००९, भारत.
वेबसाईट: www.adanielectricity.com
CIN: U74999GJ2008PLC107256

# सार्वजनिक सूचना

**अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई – निर्मिती व्यवसाय यांच्या, आ.व. २०१७–१८ आणि आ.व. २०१८–१९ साठी अचूक समायोजन, आ.व. २०१९–२० साठी हंगामी अचूक समाशोधन आणि आ.व.२०२०–२१ ते २०२४–२५ या नियंत्रण काळासाठी एआरआर आणि दराची मंजुरी यांच्यासाठीच्या याचिकेवर सूचना/ आक्षेपांची मागणी. (२०१९ चा प्रकरण क्र. २९८)**

१. अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड – निर्मिती व्यवसाय (एईएमएल–जी) यांनी, आ.व. २०१७–१८ आणि आ.व. २०१८–१९ साठी संकलित महसुली तुटीच्या (एआरआर) अचूक समायोजनाची मंजुरी, मर्क (बहु वर्षीय दर) नियमावलीनुसार आ.व. २०१९–२० चे हंगामी अचूक समाशोधन आणि मर्क (बहु वर्षीय दर) नियमावली, २०१९ नुसार आ.व. २०२०–२१ ते आ.व. २०२४–२५ या नियंत्रण काळासाठी एआरआर आणि दर यांच्या मंजुरीसाठी बहु–वर्षीय दर (एमवायटी) याचिका दाखल केली आहे.

२. आयोगाने १० डिसेंबर, २०१९ रोजी याचिका दाखल करून घेतली आहे आणि अदाणी एनर्जी मुंबई लिमिटेड–जी यांना, वीज कायदा, २००३ च्या अनुभाग ६४ (२) अंतर्गत, सूचनेद्वारे जनतेकडून सूचना/ आक्षेप मागवणारी एक सार्वजनिक सूचना प्रकाशित करण्याचे निर्देश दिले आहेत.

३. याचिकेची ठळक वैशिष्ट्ये खाली दिली आहेत, ज्यांच्यामध्ये मंजूर आकडे २०१७ च्या प्रकरण क्र. २०२ मधील, १२ सप्टेंबर, २०१८ दिनांकित मर्क आदेशानुसार आहेत.

**तक्ता १: आ.व. २०१७–१८, आ.व. २०१८–१९ आणि आ.व. २०१९–२० साठी प्रचालनात्मक कामगिरी**

| तपशील | आ.व. २०१७–१८ | | आ.व. २०१८–१९ | | आ.व. २०१९–२० | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मंजूर | लेखापरीक्षित | मंजूर | लेखापरीक्षित | मंजूर | प्रस्तावित |
| उपलब्धता (%) | ९४.२० | ९४.२० | ९५.०७ | ९६.०९ | ९५.०८ | ९३.३२ |
| संयंत्र भारांक (प्लांट लोड फॅक्टर) (%) | ८०.५६ | ८०.६९ | ९५.०७ | ८२.५८ | ९५.०८ | ८३.४२ |
| उष्णता दर (किकॅल/किवॉ तास) | २४५० | २३१२ | २४५० | २२७३ | २४५० | २४५० |
| अतिरिक्त वीज वापर (एफजीडी वगळून) (%) | ८.३० | ८.३० | ८.५० | ८.१८ | ८.५० | ८.५० |
| एफजीडी प्रकल्पासाठी अतिरिक्त वीज वापर (एमयू) (%) | ४५.८९ | ५१.०५ | ४५.८९ | ५३.१८ | ४५.८९ | ५३.१८ |
| एफजीडी प्रकल्पासह अतिरिक्त वीज वापर (%) | ९.६ | ९.७५ | ९.६ | ९.६५ | ९.६ | ९.९६ |
| एकूण निर्मिती (एमयू) | ३५२८.५६ | ३५३४.२३ | ४१६४.०० | ३६१७.०१ | ४१७६.०० | ३६५३.७९ |
| निव्वळ निर्मिती (एमयू) | ३१८९.९० | ३१८९.८० | ३७६४.१७ | ३२६८.०३ | ३७७५.१५ | ३२९०.०५ |

**तक्ता २: आ.व. २०१७–१८ आणि आ.व. २०१८–१९ साठी अचूक समायोजन आणि आ.व. २०१९–२० साठी हंगामी अचूक समायोजन** (रु. कोटी)

| अनु क्र. | तपशील | आ.व. २०१७–१८ | | आ.व. २०१८–१९ | | आ.व. २०१९–२० | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मंजूर | लेखापरीक्षित | मंजूर | लेखापरीक्षित | मंजूर | प्रस्तावित |
| **अ** | **खर्च** | | | | | | |
| १. | एकूण इंधनाशी संबंधित खर्च | १,०५०.१९ | १,०७०.२५ | १२७०.५२ | १,१७७.९८ | १२७४.१८ | १,२२६.८३ |
| २. | प्रचालन आणि देखभाल (ओ एंड एम) खर्च | १५८.२० | १५६.५९ | १५९.६८ | १७७.२९ | १६६.३१ | १८०.५२ |
| ३. | घसारा | ३०.९० | ३१.५९ | ३३.५२ | ३४.३२ | ३६.०१ | ३४.५६ |
| ४. | दीर्घकालीन कर्जाऊ भांडवलावर व्याज, वित्तीकरण आणि पुनर्वित्तीकरण शुल्कांसह | १९.८७ | १८.९८ | १८.४ | १८.२९ | १७.४ | १५.७८ |
| ५. | खेळत्या भांडवलावरील व्याज (आयओडब्लूसी) | १३.३६ | ०.०० | ११.९७ | ८.२३ | १२.०८ | २२.५२ |
| ६. | इतर खर्च | – | – | – | ३.५३ | – | – |
| ७. | पुनर्वित्तीकरण खर्च | – | – | – | १२.१० | – | – |
| ८. | व्याजावरील खर्चातील बचतीचे निव्वळ वर्तमान मूल्य (एनपीव्ही) | – | – | – | १.५० | – | – |
| ९. | आयकर | २८.४४ | २०.१० | २८.४४ | ० | २८.४४ | ३७.७३ |
| **ब** | **एकूण महसुली खर्च** | **१,३००.९७** | **१,२९७.५१** | **१५२२.५३** | **१,४३३.२४** | **१५३४.४२** | **१,५१७.९३** |
| १०. | अधिक: इक्विटीवरील परतावा | ९२.३४ | ९२.६४ | ९४.३३ | ९४.८५ | ९५.८८ | ९६.६२ |
| **क** | **संकलित महसुली तूट** | **१३९३.३१** | **१३९०.१५** | **१,६१६.८६** | **१५२८.०९** | **१६३०.३** | **१,६१४.५५** |
| ११. | अधिक: प्रोत्साहन (पीएलएफ, जल प्रोत्साहन) | – | – | – | – | – | – |
| १२. | अधिक: इंधन खर्चांतील कार्यक्षमता लाभ १/३ : (घट) | – | २१.२८ | – | ३३.०२ | – | – |
| १३. | अधिक: ओ एंड एम खर्चांतील कार्यक्षमता लाभ १/३ : (घट २/३) | – | ०.९२ | – | –४.३५ | – | – |
| १४. | अधिक: आयओडब्लूसी मधील कार्यक्षमता लाभ १/३ : (घट) | – | ७.४० | – | ५.२६ | – | – |
| १५. | मागील वर्षाचे अधिक्य | – | – | –१५३.९१ | –१५३.९१ | – | – |
| **ड** | **निव्वळ संकलित महसुली तूट** | **१,३९३.३१** | **१,४१९.७६** | **१४६२.९५** | **१,४०८.१२** | **१६३०.३** | **१,६१४.५५** |
| **ई** | **महसूल** | | | | | | |
| १६. | विजेच्या विक्रीमधून महसूल | १,४६८.७६ | १,४६८.७६ | १४५३.४६ | १,४५०.०७ | १६२०.८१ | १,५७३.४५ |
| १७. | अ–प्रशुल्क उत्पन्न | १७.२७ | १७.०६ | ९.४९ | १२.२५ | ९.४९ | १८.९३ |
| **ख** | **एकूण महसूल** | **१,४८६.०३** | **१,४८५.८२** | **१४६२.९५** | **१,४६२.३१** | **१६३०.३** | **१,५९२.३८** |
| **ग** | **महसुली तफावत/(अधिक्य) (ड–ख)** | **–९२.७२** | **–६६.०६** | **०** | **–५४.२०** | **०** | **२२.१७** |

४. एईएमएल–जी यांनी, २०१८ च्या मामला क्र. ३१६ मधील पुनरावलोकन आदेशाच्या प्रभावावर, आ.व. २०१५–१६ आणि आ.व. २०१६–१७ साठीच्या अनुक्रमे रु. ०.०४ कोटी आणि रु. ०.२० कोटी अनुज्ञेय अतिरिक्त भांडवलीकरणाच्या संबंधात, माननीय आयोगाची परवानगी मागितली आहे. एआरआर मध्ये अतिरिक्त अनुज्ञेय भत्त्याचा प्रभाव, त्यावरील धारण खर्चासह (कॅरिंग कॉस्ट) आ.व. २०२०–२१ साठीच्या एआरआर चा एक भाग म्हणून परावर्तित झाले आहे.

५. याचिकेमधील मंजुरीसाठीचे, आ.व. २०२०–२१ ते आ.व. २०२४–२५ च्या नियंत्रण काळासाठीच्या एआरआर प्रस्तावांचे सारांश खाली दिले आहेत:

**तक्ता ३: आ.व. २०२०–२१ ते आ.व. २०२४–२५ च्या नियंत्रण काळासाठीचे प्रस्तावित एआरआर** (रु. कोटी)

| अनुक्र. | तपशील | आ.व. २०२०–२१ | आ.व. २०२१–२२ | आ.व. २०२२–२३ | आ.व. २०२३–२४ | आ.व. २०२४–२५ |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ** | **खर्च** | | | | | |
| १ | इंधनाशी संबंधित खर्च | १,३७४.१८ | १,३७४.१८ | १,३७४.१८ | १,३७८.१० | १,३७४.१८ |
| २ | प्रचालन आणि देखभाल (ओ एंड एम) खर्च | १७७.९३ | १८३.४२ | १८३.४२ | १८९.०८ | १८९.०८ |
| ३ | घसारा | ३६.३५ | ३९.५८ | ४१.३४ | ३५.०३ | ३६.११ |
| ४ | दीर्घकालीन कर्जाऊ भांडवलावर व्याज, वित्तीकरण आणि पुनर्वित्तीकरण शुल्कांसह | १७.२२ | २०.१४ | २१.६० | २२.५९ | २४.९० |
| ५ | खेळत्या भांडवलावरील व्याज (आयओडब्लूसी) | २२.५८ | २२.७२ | २२.८६ | २३.०१ | २३.०९ |
| ६ | इतर खर्च | – | – | – | – | – |
| **ब** | **एकूण महसुली खर्च** | **१,६२८.२६** | **१,६४०.०४** | **१,६४३.४०** | **१,६४७.८१** | **१,६४७.३६** |
| ७ | अधिक: इक्विटीवरील परतावा | १२१.२१ | १२६.८७ | १३१.४२ | १३५.३८ | १४०.२९ |
| ८ | वजा: अ–प्रशुल्क उत्पन्न | –१८.९३ | –१८.९३ | –१८.९३ | –१८.९३ | –१८.९३ |
| **क** | **संकलित महसुली तूट** | **१,७३०.५३** | **१,७४७.९८** | **१,७५५.८८** | **१,७६४.२६** | **१,७६८.७२** |
| | **मागील वर्षांतील महसुली तफावत/ (अधिक्य)** | **–१७.१०** | | | | |
| **ड** | **निव्वळ संकलित महसुली तूट** | **१,७१३.४४** | **१,७४७.९८** | **१,७५५.८८** | **१,७६४.२६** | **१,७६८.७२** |

**तक्ता ४: आ.व. २०२०–२१ ते आ.व. २०२४–२५ नियंत्रण काळासाठी प्रस्तावित दरपत्रक**

| तपशील | एकक | आ.व. २०२०–२१ | आ.व. २०२१–२२ | आ.व. २०२२–२३ | आ.व. २०२३–२४ | आ.व. २०२४–२५ |
|---|---|---|---|---|---|---|
| वार्षिक स्थिर शुल्क | रु. कोटी | ३३९.२६ | ३७३.८० | ३८१.७० | ३८६.१६ | ३९४.५४ |
| परिवर्तनशील खर्च | रु. कोटी | १,३७४.१८ | १,३७४.१८ | १,३७४.१८ | १,३७८.१० | १,३७४.१८ |
| ऊर्जा शुल्क | रु./किवॉ तास | ३.७१४ | ३.७१४ | ३.७१४ | ३.७१४ | ३.७१४ |

६. खालील दस्तऐवजांच्या प्रती लेखी विनंती केल्यास अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड – जी यांच्या कार्यालयातून प्राप्त केल्या जाऊ शकतात:

अ. याचिकेचा कार्यकारी सारांश (विनामूल्य, मराठी किंवा इंग्रजीमध्ये).

ब. तपशीलवार याचिका दस्तऐवज, सीडी सह (इंग्रजीमध्ये) (रोख/डीडी/धनादेशाकरवी रु. १५०/– चा भरणा केल्यावर) **''अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड''** यांच्या नावे, मुंबई येथे देय.

क. तपशीलवार याचिका दस्तऐवज (इंग्रजीमध्ये) (रु. १००/– चा भरणा केल्यावर)

ड. तपशीलवार याचिका दस्तऐवजाची सीडी (इंग्रजीमध्ये) (रु.५०/– चा भरणा केल्यावर)

| कार्यालय | पत्ता | दूरध्वनी क्रमांक/ फॅक्स क्रमांक | ई–मेल |
|---|---|---|---|
| कार्यालय | श्री विवेक मिश्रा, अतिरिक्त उपाध्यक्ष, व्यवसाय नियामक अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड, सीटीएस ४०७ / ए (नवीन), ४०८ (जुना), गाव एकसर, देवीदास लेन, एसव्हीपी रोड जवळ, बोरिवली (पश्चिम), मुंबई ४००१०३ | दूरध्वनी क्रमांक: ३००९९९९९<br>फॅक्स क्रमांक: ३००९८५५७ | vivek.g.mishra@adani.com |

७. आयोगाने एईएमएल–जी यांना, त्यांच्या याचिकेवर या सूचने द्वारे जनतेकडून सूचना/ आक्षेप मागविण्याचे निर्देश दिले आहेत. सूचना/ आक्षेपाच्या इंग्रजी किंवा मराठीतून, सहा (५+१) प्रती, **सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३रा मजला, केंद्र क्र. १, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई–४०० ००५ यांना, टपालाने/ कुरियरने/ हाताने किंवा फॅक्स किंवा ई–मेलने (फॅक्स: ०२२ २२१६३९७६, ई–मेल आयडी: mercindia@merc.gov.in) शुक्रवार, ३ जानेवारी, २०२०** पर्यंत, सेवेच्या पुराव्यासह श्री. विवेक मिश्रा, अतिरिक्त उपाध्यक्ष – व्यवसाय नियामक, अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड, सीटीएस ४०७/अ (नवे), ४०८ (जुने), एक्सर गाव, देविदास गल्ली, एसपीव्ही मार्गावर, बोरिवली (पश्चिम), मुंबई ४००१०३ (फॅक्स: ३००९८५५७, ईमेल: vivek.g.mishra@adani.com) यावर पाठवाव्या आणि त्यावर पाठवणाऱ्याचे संपूर्ण नाव, टपालाचा पत्ता आणि ई–मेल पत्ता, असल्यास, असावा. ही सूचना/ आक्षेप कोणत्याही संस्थेच्या किंवा ग्राहकांच्या श्रेणीच्या वतीने दाखल करण्यात येत असेल, तर तसा उल्लेखही असावा. तसेच, पाठवणाऱ्याला व्यक्तिगत स्वरूपात बोलणी करायची असेल, तर तसाही उल्लेख असावा, ज्या परिस्थितीत, **आयोगाकरवी आयोगाचे कार्यालय, १३रा मजला, केंद्र क्र. १, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई–४०० ००५ येथे मंगळवार, ७ जानेवारी, २०२० रोजी सकाळी १०.०० वाजता** आयोजित केल्या जाणाऱ्या सार्वजनिक सुनावणीच्या वेळी तशी संधी दिली जाईल, ज्यासाठी वेगळी सूचना दिली जाणार नाही.

८. प्रत्येक प्राप्त सूचना/ आक्षेपांना एईएमएल–जी, ती प्राप्त झाल्याच्या तीन दिवसांत उत्तर देईल. **शुक्रवार, ३ जानेवारी, २०२०** पर्यंत प्राप्त झालेल्या सर्व सूचना/ आक्षेपांना **सोमवार, ६ जानेवारी, २०२०** पर्यंत उत्तर दिले जाईल. एईएमएल–जी यांनी दिलेल्या उत्तरांना सार्वजनिक सुनावणीच्या वेळी किंवा **शुक्रवार, १० जानेवारी, २०२०** पर्यंत प्रत्युत्तर सादर केले जाऊ शकते.

९. तपशीलवार याचिका दस्तऐवज आणि कार्यकारी सारांश एईएमएल–जी यांच्या संकेतस्थळावर https://www.adanielectricity.com/Regulatory येथे उपलब्ध आहे आणि तसेच, कार्यकारी सारांश आयोगाच्या संकेतस्थळावर www.merc.gov.in येथेही डाऊनलोड करण्यायोग्य स्वरूपात (विनामूल्य) उपलब्ध आहे.

स्वाक्षरी/–
किशोर पाटील
अधिकृत स्वाक्षरीकर्ता

ठिकाण: मुंबई
दिनांक:१३ डिसेंबर, २०१९